ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम.

साठवण तलावाचा खर्च नळपाणी
पुरवठा योजनेच्या दरडोई खर्चात
अंतर्भूत न करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
शासन निर्णय क्रमांक :ग्रापापु-१०९५/सीआर१०८७/पापु-०७.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दि. ०२ ऑक्टोबर, १९९६.-

प्रस्तावना :-

राज्यातील पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा आढावा घेऊन
सदर कार्यक्रम आणखी परिणामकारकरित्या राबविण्यासाठी कोणत्या उपाय-
योजना करणे आवश्यक आहे, हे निश्चित करण्यासाठी व त्यानुसार धोरण
ठरविण्यासाठी शासनाने एक कृतीपत्रिका काढली होती. शासनाच्या असे निदर्शनास
आले आहे की, ग्रामीण भागातील नळ योजना घेतांना त्या जलाशयातून थेट
नलिकेद्वारे थेट पाणी उचलून आणण्याबाबत पाटबंधारे विभागाचा आग्रह असतो.
परंतु प-याच ठिकाणी ते शक्य होत नसल्यामुळे तसेच योजनेचा खर्च कमी करण्या-
साठी जलाशयातून पाणी थेट न उचलता कालव्यातून किंवा नदीद्वारे पाणी
वाहत नेऊन योजना आखल्या जातात. अशा प्रकारे नळ योजना आखल्यास
त्यासाठी साठवण तलाव बांधकामाची अट विहित करण्यात आलेली आहे.
त्यानुसार बारमाही पाणी सोडण्याची तरतूद असलेल्या प्रकल्पाखालील नदीसाठी
एक महिना व आठमाही प्रकल्पाखालील नदीसाठी चार महिने इतक्या
कालावधीसाठी पुरेल एवढे क्षमतेचे साठवण तलाव त्याप्रमाणे कालवा उद्भव
असल्यास बारमाही कालावधीसाठी ६० दिवस व आठमाही कालावधीसाठी
१५० दिवस पुरेल इतक्या क्षमतेचे साठवण तलाव बांधणे बंधनकारक करण्यात आले
आहे. साठवण तलावाच्या बांधकामाचा खर्च जमेस धरल्यास काही वेळा योजना
दरडोई खर्चाच्या निकषामध्ये बसत नाहीत व योजनेस प्रशासकीय मान्यता
देण्यामध्ये अडचणी उद्भवतात. सदर बाब लक्षात घेऊन याबाबत शासनाने
पुढील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे :-

शासन निर्णय :-

ग्रामीण भागातील ज्या नळ योजना जलाशयातून थेट पाणी न उचलता
कालव्यातून किंवा नदीद्वारे पाणी वाहत नेऊन आखल्या जातात, अशा
योजनांसाठी विहित क्षमतेचा साठवण तलाव बांधण्यासाठी येणारा खर्च हा
नळ योजनेच्या दरडोई खर्चात अंतर्भूत न करता तो स्वतंत्रपणे दाखविण्यात यावा

....२/-

व त्या त्या योजनेवरील खर्च ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येईल त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

२. सदर शासन निर्णय, पाटबंधारे विभाग, नियोजन विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीने वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. १०१०/९६ व्यय-३, दि. ०१.१०.१९९६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ म.गो. पंचभाई. ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
[१] मा. राज्यपालांचे सचिव,
[२] मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव,
[३] मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
[४] सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
[५] सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद,
[६] सर्व जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन व विकास मंडळ,
[७] सर्व विभागीय आयुक्त,
[८] मुख्य अभियंता [ग्रामीण], महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ, मुंबई.
[९] संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे - ३७.
[१०]सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
[११]महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर [लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता].
[१२]मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/नागपूर.
[१३]सर्व उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा.
[१४]नियोजन विभाग [२ प्रती].
[१५]वित्त विभाग [व्यय-३/अर्थोपाय], महसूल व वन विभाग/स.का.सां.का. व क्रिडा विभाग/सार्वजनिक आरोग्य विभाग/वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग/पाटबंधारे विभाग/ग्रामविकास व जलसंधारण विभाग.
[१६]पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.
[१७]निवड नस्ती, कार्यासन क्र. पापु-०७, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.